महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०२६

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

बुधवार, दिनांक ०८ जुलै, २०२६ / आषाढ १७, १९४८ (शके)

(१)	**वैद्यकीय शिक्षण मंत्री**	
(२)	**पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**	
(३)	**मृद व जलसंधारण मंत्री**	
(४)	**उद्योग, मराठी भाषा मंत्री**	**यांचे प्रभारी विभाग**
(५)	**महिला व बालविकास मंत्री**	
(६)	**ग्रामविकास व पंचायत राज मंत्री**	
(७)	**कामगार मंत्री**	
(८)	**सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**	

प्रश्नांची एकूण संख्या - २९

मुंबईतील सर ज.जी. समुह रुग्णालयातील समाजसेवा विभागातील कर्मचाऱ्यांच्या असंवेदनशील वर्तनामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याबाबत

(१) * ४०५२९ श्री.विलास भुमरे (पैठण) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सर ज.जी. समुह रुग्णालयात (ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय) उपचारासाठी दाखल होणाऱ्या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून समाजसेवा विभागातील काही अधिकारी व कर्मचारी असंवेदनशील, वर्तन करीत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून याबाबत लोकप्रतनिधी यांनी रुग्णालय प्रशासनाकडे लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समाजसेवा विभागातील काही कर्मचारी नियमितपणे कार्यालयीन वेळेत अनुपस्थित रहाणे, रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना आवश्यक माहिती व मार्गदर्शन वेळेत न देणे, कार्यालयीन वेळेत वैयक्तिक कारणांसाठी वेळ वाया घालविणे तसेच रुग्णसेवेमध्ये हलगर्जीपणा करणे इ.बाबी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी सर ज.जी.समुह रुग्णालय प्रशासनामार्फत उच्चस्तरीय चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार संबधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगात्मक कारवाई करणेसह भविष्यात रुग्णांना संवेदनशील, पारदर्शक व दर्जेदार सेवा मिळण्यासाठी कोणत्या सुधारात्मक उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ : (१) (२) व (३) सर ज.जी. समुह रुग्णालयातील समाजसेवा अधिक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांबाबत संस्थेकडे तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने संस्थास्तरावर चौकशी समिती गठीत करुन चौकशी करण्यात आली आहे.
(४) चौकशी समितीचा अहवाल विचारात घेवून अधिष्ठाता, सर ज.जी. समुह रुग्णालय यांनी समाजसेवा अधिक्षक संवर्गातील ज्या कर्मचाऱ्यांबाबत तक्रार आहे अशा कर्मचाऱ्यांना यापुढे कर्तव्यात कसुर होणार नाही अशा सूचना दिल्या आहेत, जे कर्मचारी विनापरवानगी गैरहजर आहेत अशा कर्मचाऱ्यांची रजा विनावेतन करण्यात आलेली आहे. दोषी आढळून आलेल्या समाजसेवा अधिक्षकांपैकी २ जणांची वैद्यकीय शिक्षण संचालनालयाच्या दि. २६/०६/२०२६ रोजीच्या आदेशान्वये अन्य ठिकाणी बदली करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मारेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील गावांमध्ये स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करणेबाबत

(२) * ३६०७८ श्री.संजय देरकर (वणी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मारेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील सुमारे २२ गावांमध्ये अद्याप शासकीय मान्यताप्राप्त स्मशानभूमी उपलब्ध नसल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित गावांमध्ये स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून देण्यात अथवा आरक्षित करण्यास प्रशासकीय, तांत्रिक अथवा महसूली अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तालुक्यातील ज्या गावांमध्ये स्मशानभूमी उपलब्ध नाही त्या ठिकाणी नागरिकांना नदी-नाल्यांच्या काठावर, उघड्यावर अथवा खाजगी जमिनीवर अंत्यसंस्कार करावे लागत असल्याने सामाजिक, आरोग्यविषयक व पर्यावरणीय धोके निर्माण होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर तालुक्यातील उर्वरित सुमारे ३४ गावांतील विद्यमान स्मशानभूमींची अवस्था अत्यंत दयनीय असून तेथे अंत्यसंस्कारासाठी आवश्यक टिनशेड, शवदाहिनी, पिण्याच्या पाण्याची सुविधा, प्रकाश व्यवस्था तसेच सर्व ऋतूंमध्ये वापरता येईल असे रस्ते उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना गंभीर गैरसोयींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, पावसाळ्यामध्ये उघड्यावर अंत्यसंस्कार करताना पावसामुळे पेटलेले सरण विझून जाण्याच्या घटना घडत असल्याने मृत व्यक्तींच्या अंतिम संस्कारात अडथळे निर्माण होत असून त्यामुळे दुःखद प्रसंगी ग्रामस्थांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर तालुक्यातील स्मशानभूमी नसलेल्या गावांचे सर्वेक्षण करून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा नियोजन समिती, ग्रामविकास विभाग अथवा अन्य योजनांतर्गत विशेष प्रस्ताव तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, या प्रस्तावाच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित २२ गावांमध्ये तातडीने स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून देणे तसेच उर्वरित गावांतील स्मशानभूमींमध्ये टिनशेड, शवदाहिनी, पाण्याची सुविधा, अंतर्गत रस्ते, संरक्षण भिंत व स्वच्छता व्यवस्था उभारण्यास मंजूरीसह निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे : (१), (२), (३), (४), (५), (६) व (७) मारेगाव तालुक्यातील उजाड गावे वगळता ९३ महसूली गावांपैकी ६१ महसूली गावांना स्मशानभूमी उपलब्ध आहे.

यावरुन एकूण ३२ महसूली गावांमध्ये स्मशानभूमी आजमितीला उपलब्ध नाही. याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ) १६ महसूली गावांना स्मशानभूमीसाठी जागा असून त्यापैकी ३ ठिकाणी स्मशानभूमी मंजूर आहे. उर्वरित १३ महसूली गावासांठी स्मशानभूमीचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, यवतमाळ यांच्याकडे सादर केला आहे.

ब) १६ महसूली गावांसाठी स्मशानभूमी उपलब्ध नसल्याने खाजगी जागा दानपत्राद्वारे व शासकीय जागा उपलब्ध करून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे.

क) तसेच, स्मशानभूमी उपलब्ध असलेल्या ठिकाणी ज्या सुविधांची कमतरता आहे, अशा ठिकाणी सुविधा पुरविण्यासाठी जिल्हा नियोजन समिती, यवतमाळ यांच्याकडे प्रस्ताव सादर केला आहे.

(८) प्रश्न उद्भवत नाही.

जालना जिल्हयाच्या पंचायत समिती अंतर्गत घरकुल योजनांमध्ये झालेला गैरव्यवहार

(३) * ३९९७१ श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.अर्जुन खोतकर (जालना) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयाच्या पंचायत समिती अंतर्गत विविध घरकुल योजनांमध्ये बनावट जिओ-टॅगिंग व अवैध वसुलीद्वारे शासन निधीचा अपहार झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सिंचन विहीर व ग्रामसमृद्धी योजनांमध्ये मंजुरीसाठी लाभार्थ्यांकडून पैशांची मागणी करणे, मनरेगा योजनेंतर्गत बनावट मजूर दाखवून निधीचा गैरवापर करणे, १४ व १५ वा वित्त आयोगाच्या निधीत खरेदी घोटाळा व कमिशनबाजी केल्याचे तसेच जलजीवन मिशन व स्वच्छ भारत मिशनमध्ये निकृष्ट कामे व बनावट लाभार्थ्यांद्वारे निधी अपहार झाल्याच्या अनेक तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी मुख्य कार्यवाही अधिकारी, जिल्हापरिषद जालना यांचेकडे दाखल केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने या सर्व आरोपांप्रकरणी गटविकास अधिकारी श्री. संदीप पवार यांच्याविरुद्ध निलंबन व फौजदारी गुन्हे दाखल करुन कारवाई करण्यासह गैरव्यवहार केलेल्या रक्कमेची वसुली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे : (१) व (२) अशा आशयाच्या तक्रारी प्राप्त आहेत.

(३) प्रकरणात प्राप्त तक्रारीबाबत चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीस ८ दिवसांत चौकशी पूर्ण करुन अहवाल सादर करणेबाबत दि. १५/०६/२०२६ रोजीच्या आदेशान्वये आदेशित केले आहे.

या समितीकडून अहवाल अद्याप अप्राप्त आहे. चौकशी अहवालातील प्राप्त निष्कर्षाप्रमाणे उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील बाल निरीक्षण गृहांमधील सुरक्षा व्यवस्थेचे विशेष लेखापरीक्षण करण्याबाबत

(४) * ४०६३४ डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध बाल निरीक्षण गृहांमध्ये स्मार्ट सर्व्हिसेस कंपनी, पुणे यांच्यामार्फत करारानुसार आवश्यक असलेल्या सुरक्षा रक्षकांची (सिक्युरिटी गार्ड) नेमणूक करण्यात आली असून सदर कंपनीकडून सुरक्षा रक्षकांचे वेतन अदा करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध बाल निरीक्षण गृहांमध्ये सुरक्षा रक्षकांची नियुक्ती न करता कमी मनुष्यबळ पुरविण्यात येऊन प्रत्यक्षात कमी सुरक्षा रक्षक कार्यरत असतानाही संबंधित कंपनीने पूर्ण मनुष्यबळ पुरविल्याचे दर्शवून शासनाकडून लाखो रुपयांची देयके अदा करून घेतली आहेत, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, बाल निरीक्षण गृहांमधील सुरक्षा व्यवस्थेचे विशेष लेखापरीक्षण (ऑडिट) करून प्रत्यक्ष उपलब्ध मनुष्यबळ व अदा करण्यात आलेली देयके यांची पडताळणी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित कंपनीकडून आर्थिक अनियमितता, करारभंग व निधीचा झालेला अपहार यास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करणेसह सर्व बाल निरीक्षण गृहांमधील सुरक्षा व्यवस्थेचे विशेष लेखापरीक्षण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे : (१) होय, हे खरे आहे.

(२) जे सुरक्षा रक्षक प्रत्यक्ष कार्यरत आहेत त्यांची उपस्थिती विचारात घेवून मानधन अदा करण्यात येते.

(३) (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

जळगाव जिल्हा सामान्य रुग्णालयात मॉलिक्युलर डीएनए टेस्टिंग प्रयोगशाळा उभारणीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

(५) * ३३८४६ श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हा सामान्य रुग्णालयात मॉलिक्युलर डीएनए टेस्टिंग प्रयोगशाळा उभारणीकरीता सुमारे रु.११ कोटी ९९ लाख इतका खर्च दर्शवून आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रयोगशाळेच्या उभारणीसाठी तांत्रिक मान्यता, प्रस्ताव सादरीकरण व निविदा प्रक्रिया एका दिवसात पूर्ण करण्यात आल्या असून काम सुरू होण्यापूर्वीच सुमारे रु.२ कोटी व नंतर अपूर्ण काम असतानाही आणखी सुमारे रु.२ कोटी ९९ लाख इतक्या रक्कमेची देयके अदा करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रत्यक्ष पाहणी अहवालानुसार प्रयोगशाळेत यंत्रसामग्री सीलबंद स्थितीत असून कोणतेही उपकरण कार्यान्वित नसतानाही देयके मंजूर करण्यात आली असल्याचे व संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर पूर्वनियोजित आर्थिक लाभाचा आरोप करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर प्रकरणात दोषी असणाऱ्या संबंधितांवर फौजदारी कारवाई करुन त्यांच्याकडून रकमेची वसूली करणेसह सदर प्रयोगशाळा कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक, जळगांव यांचा प्रस्ताव व उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक यांच्याकडील तांत्रिक मान्यता दिनांक २३/०८/२०२४ रोजी देण्यात आली असल्याचे दिसून येते. जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी जळगाव यांनी दिनांक २८/०८/२०२४ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक, जळगाव यांनी ई-निविदा प्रक्रिया वृत्तपत्रात दिनांक ०३/०९/२०२४ रोजी तसेच, ई-महाटेंडर या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करून ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करून संबंधित पुरवठादारास दिनांक २७/०९/२०२४ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.

तसेच, कार्यारंभ आदेश झाल्यानंतर संबंधित पुरवठादाराने दिनांक ०४/०२/२०२५ रोजी मॉलिक्युलर लॅबचे ४० टक्के काम पूर्ण झाल्याचे अहवाल सादर करून रू.२ कोटी अग्रिम मिळणेबाबत केलेल्या विनंतीस अनुसरून जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रूग्णालय जळगाव यांनी सदर रकमेचे देयक कोषागारात सादर करून संबंधित पुरवठादारास अदा केले आहे. तद्नंतर जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडून वेळोवेळी देयके आहरित करण्यात आली आहेत. संबंधित पुरवठादारास एकूण रु.११,९९,५८,८००/- रकमेची देयके अदा केलेली आहेत.

(३) व (४) हे अंशत: खरे आहे,

सद्य:स्थितीत सदर प्रयोगशाळा ही वैद्यकीय महाविद्यालय अंतर्गत कार्यरत आहे. सदर प्रयोगशाळा काम पूर्ण झाल्यावर कार्यान्वित करून संबंधित तपासण्या सुरू करण्यात आल्या आहेत. माहे जुलै, २०२५ ते मे, २०२६ या कालावधीमध्ये सुक्ष्मजीव शास्त्र विभागात एकूण ३७० नमूने तपासण्यात आले आहेत.

वरील प्रकरणी समिती नेमून सखोल चौकशी करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

बीड जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या "आरोग्य साथी" योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत

(६) * ३६२८३ श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात ऊसतोड मजूरांच्या आरोग्याच्या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या "आरोग्य साथी" या योजनेंतर्गत ऊसतोड महिला मजूरांना विशेष प्रशिक्षण देऊन फडावरच प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत प्रशिक्षित आरोग्य साथीमार्फत ताप, जखमा, त्वचारोग, निर्जलीकरण, खरुज, मळमळ, जुलाब आदी आजारांवर तातडीने उपचार केले जात असल्यामुळे ऊसतोड मजुरांचे आरोग्य सुधारण्यास मदत होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थलांतरित ऊसतोड मजुरांचा सरकारी आरोग्य यंत्रणेशी तुटणारा संपर्क पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी व ग्रामीण व स्थलांतरित मजुरांपर्यंत आरोग्य सेवा थेट पोहोचविण्यासाठी हा बीड पॅटर्न प्रभावी ठरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याअनुषंगाने राज्यातील इतर ऊस उत्पादक जिल्हे तसेच स्थलांतरित व असंघटित मजूर मोठ्या प्रमाणात असलेल्या भागांमध्येही "आरोग्य साथी" योजना राज्यस्तरावर राबविणे तसेच यासाठी आवश्यक निधी, प्रशिक्षण व आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१), (२), (३), व (४) होय, हे खरे आहे.

स्थलांतरीत ऊसतोड मजुरांच्या विविध समस्यांकरिता जिल्हा परिषद बीड यांचे मार्फत " मिशन साथी" उपक्रमाची सुरुवात करण्यात आली असून या उपक्रमांतगर्त आरोग्य विभाग,जिल्हा परिषद बीड यांचे मार्फत प्रायोगिक तत्वावर "आरोग्य साथी उपक्रम " सुरु करण्यात आला आहे.

ग्रामपंचायतच्या माध्यमातून ऊसतोड कामगार महिलांमधुन प्रती १०० ऊसतोड कामगारांकरिता एक या प्रमाणे "आरोग्य साथी" यांची नेमणुक जिल्ह्याव्दारे करण्यात आली आहे.

आरोग्य साथी मजुरांना कामाच्या ठिकाणी फडावरच प्राथमिक उपचार, आरोग्य मार्गदर्शन, आजारांचे लवकर निदान, स्वच्छता व पोषणाबाबत समुपदेशन तसेच आवश्यकतेनुसार दवाखान्यात रेफरल सेवा उपलब्ध करुन देतात. यामुळे ऊसतोड मजुरांचे आरोग्य जपले जाते आणि गंभीर आजार टाळता येतात.

बीड जिल्ह्यात एकूण ४४६ आरोग्य साथीचे प्रशिक्षण पुर्ण झाले असून या प्रशिक्षित निवडलेल्या आरोग्य साथींनी ऊसतोडणी हंगामादरम्यान एकूण ११७८ ऊसतोड कामगारांना किरकोळ आजारांवर प्रथमोपचार व संदर्भ सेवा देण्यात आली आहे.

राज्यस्तरावरुन बीड जिल्ह्याप्रमाणे ज्या जिल्ह्यांमध्ये ऊसतोड कामगार आहेत, त्या जिल्ह्यांमध्ये देखील आरोग्य साथी यांची निवड करुन त्यांना प्रशिक्षण देण्याचा उपक्रम राबविण्याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी / जिल्हा शल्य चिकित्सक यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

नागभीड (जि.चंद्रपूर) पंचायत समिती अंतर्गत सेवानिवृत्त शिक्षकांचे उपदान व अंशराशीकरणाची रक्कम वितरीत करण्याबाबत

(७) * ३३०१४ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागभीड (जि.चंद्रपूर) पंचायत समिती अंतर्गत ३० ते ३५ वर्षे सेवा करून सेवानिवृत्त झालेल्या २६ शिक्षकांचे उपदान व अंशराशीकरण मिळून एकूण रुपये ४ कोटी ३४ लाख ८३ हजार ९८८ इतकी रक्कम पंचायत समितीच्या प्रशासकीय दिरंगाईमुळे अद्यापही संबंधितांच्या खात्यात जमा झाली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिक्षक माहे जून व जुलै, २०२५ पासून सेवानिवृत्त झाले असून त्यांच्यासाठी माहे फेब्रुवारी व मार्च, २०२६ मध्ये विशेष निधी मंजूर करण्यात येऊन दिनांक २७ मार्च, २०२६ रोजी वा त्यादरम्यान नागभीड पंचायत समितीस निधी प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्राप्त निधी दिनांक ३१ मार्च, २०२६ पूर्वी संबंधित शिक्षकांच्या खात्यात जमा होणे अपेक्षित असताना पंचायत समिती प्रशासनाकडून चुकीची देयके सादर करणे, देयक सादरीकरणात विलंब करणे तसेच तांत्रिक त्रुटींमुळे निधी वितरण प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणात संवर्ग विकास अधिकारी तसेच संबंधित लेखा विभागाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे सेवानिवृत्त शिक्षकांना त्यांच्या हक्काच्या रकमेसाठी प्रतीक्षा करावी लागणे, बँक कर्जाचे हप्ते, पतसंस्थांची देणी तसेच अन्य आर्थिक बांधिलकी प्रलंबित राहिल्याने त्यांना अतिरिक्त व्याजाचा भुर्दंड सहन करावा लागत असल्यामुळे त्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यातील इतर पंचायत समित्यांमध्येही अशाच प्रकारे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे उपदान व अंशराशीकरण प्रलंबित असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर २६ शिक्षकांची प्रलंबित रक्कम तातडीने वितरित करणे, संबंधित प्रशासकीय त्रुटी दूर करणेसह यास जबाबदार संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे : (१),(२),(३) व (४) पंचायत समिती नागभिड अंतर्गत सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांचे उपदान व अंशराशीकरण मिळून एकूण रु.४,३४,८३,९८८/- इतकी रक्कम पंचायत समितीला दि.२४/३/२०२६ रोजी प्राप्त झाली. त्यानुसार सेवानिवृत्त शिक्षकांचे उपदान व अंशराशीकरणाची रक्कम संबंधितांना प्रदान करण्यास्तव प्राप्त निधीच्या अनुषंगाने दि.३०/३/२०२६ रोजी देयके मंजूर करण्यात आलेली होती.

परंतु, जिल्हा परिषद फंड मॉनिटरींग सिस्टिम (ZPFMS) प्रणालीमध्ये निधी वितरण करताना प्रणालीमधील MAHAPAY TAB मध्ये दि. ३१/०३/२०२६ रोजी दुपारच्या सत्रापासून तांत्रिक अडचण आल्यामुळे सदर सेवानिवृत्त शिक्षकांचे उपदान व अंशराशीकरण व इतर सेवा निवृत्तीवेतन विषयक लाभ ZPFMS प्रणालीमार्फत अदा न करता धनादेशाव्दारे अदा करण्यात आलेले आहेत.

(५) हे खरे नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मालेगाव (जि.नाशिक) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास
महामंडळाच्या भूसंपादनात झालेला गैरव्यवहार

(८) * ३२५१० श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) येथील अतिरिक्त औद्योगिक भूसंपादनाच्या पहिल्या टप्प्यात झालेल्या कथित गैरव्यवहार व आर्थिक फसवणूक प्रकरणाची तक्रार दिनांक ०९ मे, २०२६ रोजी वा त्यासुमारास महराष्ट्र औद्योगिक विकास मंहामंडळाच्या (एमआयडीसी) प्रादेशिक अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वेदनाच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार या प्रकरणात आढळलेल्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत : (१) हे खरे आहे.

मालेगाव (जि.नाशिक) येथील अतिरिक्त औद्योगिक भूसंपादनाच्या पहिल्या टप्प्यात झालेल्या कथित गैरव्यवहार प्रकरणाची तक्रार दि. ०९ मे, २०२६ रोजीच्या निवेदनाव्दारे मऔवि महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथे प्राप्त झाली आहे.

(२) मऔवि महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालय, नाशिक अंतर्गत सिन्नर माळेगाव टप्पा क्र.१ या क्षेत्राचे भूसंपादन करण्यात आले होते. सदर भूसंपादनादरम्यान दरीच्या जागेच्या क्षेत्राचे देखील भूसंपादन केल्याचे निदर्शनास आल्यामुळे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔवि महामंडळ यांनी सदर प्रकरणाची चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्याचे आदेश दिले होते,

त्यानुषंगाने प्रादेशिक अधिकारी, मऔवि महामंडळ, नाशिक यांनी संबंधित अधिकारी /कर्मचारी यांच्या विभागीय चौकशीचे (ज्ञापन व दोषारोपपत्र जोडपत्र १ ते ४ शासनास क्र.९१, दि. १४/०२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये

सादर करण्यात आलेले आहेत. तसेच, यातील काही अधिकारी हे सेवानिवृत्त झाले असल्यामुळे त्यांची वैयक्तीक चौकशी करणेकरीता क्र.१४१, दि. ११/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये, उप मुख्य कार्यकारी अधिकारी-३ यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. तसेच एका कर्मचाऱ्याची विभागीय चौकशी करण्यात आलेली असून सदर चौकशी मध्ये ते निर्दोष आढळून आल्यामुळे त्यांना दोषमुक्त करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात "पिंक (गुलाबी) ई-रिक्षा" या योजनेंतर्गत येणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्याबाबत

(९) * ३३१०९ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम तसेच महिलांना सुरक्षित प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या "पिंक (गुलाबी) ई-रिक्षा" या योजनेचा लाभ घेण्यासाठी महिला स्थानिक रहिवासी असणे, आवश्यक प्रशिक्षण पूर्ण केलेले असणे, व्यावसायिक परवाना असणे तसेच वाहन खरेदीसाठी २० टक्के अनुदान, ७० टक्के बँक कर्ज व १० टक्के स्वहिस्सा अशी तरतूद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बँकांकडून कर्ज मंजुरीस होणारा विलंब, ई-रिक्षामध्ये तांत्रिक बिघाड व त्या निकृष्ट दर्जाच्या असणे, चार्जिंग स्टेशनचा अभाव, परवाना व बॅज मिळविण्यात येणाऱ्या अडचणी तसेच बाजारभावापेक्षा जास्त किंमतीमुळे सदर योजनेस अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, या योजनेंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या ई-रिक्षांची किंमत खुल्या बाजारभावापेक्षा अधिक असल्याच्या तक्रारी तसेच बॅटरी समस्या व सुटे भाग उपलब्ध न होण्याच्या बाबी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील काही निवडक महानगरपालिका क्षेत्रांमध्ये ही योजना राबविण्यात येत असून नागपूर शहरासह विदर्भातील काही जिल्ह्यांचा समावेश असताना भंडारा जिल्ह्याचा या योजनेत समावेश करण्यात आलेला नाही तसेच जालना जिल्ह्यातील पात्र व गरजू महिलांना या योजनेपासून वंचित राहावे लागत असल्याने या जिल्ह्यांत सदर योजना सुरु करण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार निकृष्ट दर्जाच्या ई-रिक्षा पुरवठादारांवर कारवाई करणेसह पुरेशा प्रमाणात चार्जिंग स्टेशन उभारणे, कर्ज मंजुरी प्रक्रिया सुलभ करणे,ई-रिक्षांच्या गुणवत्तेबाबत व किंमत निर्धारणाबाबत पारदर्शकता आणणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) "पिंक (गुलाबी) ई-रिक्षा" या योजनेंतर्गत गरजू महिलांना त्यांच्या सिबील स्कोअरमुळे कर्ज व licence, Badge मिळण्यास अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने लाभार्थी महिलांना licence, Badge सुलभरित्या मिळण्याच्या अनुषंगाने आयुक्त, परिवहन यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

या व्यतिरिक्त तांत्रिक बिघाड, बॅटरी समस्या इ. बाबत कोणत्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. पिंक (गुलाबी) ई-रिक्षा पुरवठादार कंपनीकडून सुटे भाग उपलब्ध देणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहेत.
(४) व (५) महिला व मुली यांना सुरक्षित प्रवास करणे यासाठी नोकरी तसेच रोजगाराच्या जास्त संधी उपलब्ध असलेल्या पुणे, नाशिक, नागपूर, अहमदनगर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर व सोलापूर या ८ जिल्हयातील प्रमुख शहरातील सर्व भागात "पिंक (गुलाबी) ई-रिक्षा" ही योजना राबविण्यात येते आहे. तथापि, याव्यतिरिक्त अन्य जिल्हयात सदर योजना सुरु करण्याची विनंती विविध मा.लोकप्रतिनिधींकडून करण्यात येत आहे.

सदर योजनेतंर्गत पात्र लाभार्थी महिलांना बँकेकडून कर्ज उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने लाभार्थी महिला, क्षेत्रीय कार्यालय व संबंधित बँक यांच्या समन्वय साधून कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

आदिवासी बहुल तालुक्यातील महिलांना प्रसुतीनंतर घरी जाण्यासाठी विनामुल्य रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत

(१०) * ३३५६३ श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.सुनील राऊत (विक्रोळी), श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरसाळे (ता.वाडा, जि.पालघर) येथील श्रीमती रोशनिता महेश कामडी या २४ वर्षीय आदिवासी महिलेला वाडा येथील उपजिल्हा रूग्णालयात प्रसुतीसाठी दिनांक १७ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान दाखल करून घेतले, तथापि प्रसुती प्रक्रिया ही गुंतागुंतीची वाटल्याने तिला प्रसुतीसाठी ठाणे जिल्हा रूग्णालयात पाठविले असल्याचे निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्हा रूग्णालयात शस्त्रक्रियेव्दारे प्रसुती झाल्यानंतर सदर महिला आदिवासी दुर्गम भागातील असूनही रूग्णालय प्रशासनाने तिला घरी पोहोचविण्यासाठी रुग्णवाहिकेची व्यवस्था केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महिलेस वाडा येथे जाण्यासाठी १०२ क्रमांकाच्या रूग्णवाहिका पालघरला जात नाही तसेच १०८ क्रमांकाच्या रूग्णवाहिकेतून स्तनदा मातांना नेता येणार नसल्याची कारणे देत रुग्णवाहिकेची सेवा सदर महिलेस मिळाली नसल्याने तीला एस.टी.ने वाडयापर्यत प्रवास करावा लागला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबबात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार या प्रकरणामध्ये दोषी आढळून आलेल्या रुग्णालय प्रशासनावर कारवाई करणेसह आदिवासी बहूल तालुक्यातील महिलांना प्रसुतीनंतर घरी जाण्यासाठी विनामुल्य रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१), (२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

सदर रुग्णाची प्रसुती दि.१८/०४/२०२६ रोजी झाली असून, दि.२२/०४/२०२६ रोजी दुपारी ०४.०० वा. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार प्रसुती कक्षातून डिस्चार्ज दिलेला होता.

ड्रॉपबॅक सेवेसाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये सकाळीच नियोजित रुट तयार करण्यात येतो व त्यानुसार संबंधित रुग्णांना त्यांच्या गावी सोडण्यात येते. मात्र सदर रुग्ण सायंकाळी ड्रॉपबॅक सेवेसाठी आले होते. त्यावेळी संबंधित रुटमधील इतर सर्व रुग्णांना आधीच त्यांच्या घरी सोडण्यात आले होते. त्यामुळे संबंधित रुग्णास दुसऱ्या दिवशी ड्रॉपबॅक सेवा उपलब्ध करुन देण्यात येईल, असे विनम्रपणे सांगण्यात आले होते.

तथापि, रुग्णाचे नातेवाईकांनी न थांबता रुग्णाला घेऊन निघून गेले.

दि.२४/०४/२०२६ रोजी दैनिक महाराष्ट्र टाईम्समध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे यांनी त्यांच्या दि.२७/०४/२०२६ रोजीच्या आदेशान्वये चौकशी समिती गठित केली. चौकशी समितीने सदर प्रकरणी अधिपरिचारीकेने रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यामध्ये हलगर्जीपणा केल्याचा निष्कर्ष

काढला आहे. जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे यांनी त्यांच्या दि.२९/०४/२०२६ रोजीच्या ज्ञापनान्वये सक्त ताकिद दिली आहे. तर दि.१८/०६/२०२६ अन्वये कंत्राटी अधिपरिचारीका यांची सेवा समाप्त करण्यात आली आहे. तसेच दि. ०४/०५/२०२६ रोजीच्या आदेशान्वये रुग्णांना डिस्चार्ज देतांना रुग्णवाहिका औषधे, पुढील तपासणीची तारीख इत्यादी बाबत अवगत करणे आणि दुपारी १२.०० च्या आत डिस्चार्ज देणे याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

केंद्र पुरस्कृत प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमांतर्गत जननी सुरक्षा योजना व जननी शिशु सुरक्षा योजनेंतर्गत मोफत वाहतूक सुविधा दिली जाते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेंतर्गत डायलिसिस रुग्णांसाठी सुलभ उपचार सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

(११) * ३३५२५ श्री.राजेश बकाने (देवळी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य या योजनेंतर्गत इतर गंभीर आजारांच्या उपचारासाठी रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांना केवळ भरती व डिस्चार्जच्या वेळीच बायोमेट्रिक पडताळणी करावी लागते परंतु डायलिसिस उपचार घेणाऱ्या रुग्णांना प्रत्येक डायलिसिस सत्रावेळी बायोमेट्रिक पडताळणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डायलिसीस रुग्ण हे बहुधा शारीरिकदृष्ट्या अशक्त, वृद्ध, गंभीर अवस्थेतील अथवा हालचाल करण्यास असमर्थ असून अनेकदा बोटांचे ठसे न लागणे, हात सुजलेले असणे, मशीन कार्यरत नसणे अथवा नेटवर्क समस्यांमुळे बायोमेट्रिक प्रक्रिया पूर्ण होण्यास अडथळे निर्माण होत असल्याने उपचारास विलंब होत असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील किती डायलिसिस रुग्णालये अथवा केंद्रांकडून अशा स्वरूपाच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत,
(४) असल्यास, डायलिसिस रुग्णांसाठी प्रत्येक उपचारावेळी बायोमेट्रिक सक्तीमुळे उपचार प्रक्रियेत व्यत्यय येत असल्याने त्याचा प्रतिकुल परिणाम रुग्णांच्या आरोग्यावर होत असून या नियमाचा फेरविचार करण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव अथवा शिफारस पाठविण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार डायलिसिस रुग्णांसाठी इतर आजारांप्रमाणे केवळ भरती व डिस्चार्जच्या वेळीच बायोमेट्रिक पडताळणी करणे व वृद्ध, दिव्यांग व गंभीर अवस्थेतील रुग्णांसाठी पर्यायी सुलभ पडताळणी तसेच त्रासमुक्त, सुलभ व मानवीय उपचार सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) हे खरे आहे.

आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योनजेची अंमलबजावणी राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या TMS२.० प्रणालीवर करण्यात येत आहे. यामध्ये डायलिसिस उपचार घेणाऱ्या रुग्णांना प्रत्येक डायलिसिस सत्रासाठी एक वेळेस बायोमेट्रिक पडताळणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे.
(२) व (३) प्रश्नाधीन विषयाबाबत राज्य आरोग्य हमी सोसायटीकडे १९ रुग्णालयांकडून निवेदने प्राप्त झाली असून अन्य काही रुग्णालयांनी ही बाब दूरदृश्य चर्चेद्वारे निदर्शनास आणून दिली आहे.

(४) व (५) डायलिसिस रुग्णांसाठी फिंगर बायोमेट्रिक प्रमाणीकरणाशिवाय फेस ऑथेंटीकेशन (Face Authentication) आणि आयरिस ऑथेंटीकेशन (Iris Authentication) हे पर्याय देखील उपलब्ध आहेत.

तथापि, डायलिसिस रुग्णांसाठी प्रत्येक उपचारावेळी बायोमेट्रिक सक्तीमुळे उपचार प्रक्रियेत व्यत्यय होत असल्याची बाब राज्य आरोग्य हमी सोसायटीद्वारे दिनांक १८/०६/२०२६ रोजीच्या पत्रान्वये राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या निदर्शनास आणून देण्यात आली असून याबाबत राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाकडून प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याची तजवीज राज्य आरोग्य हमी सोसायटीमार्फत ठेवण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

गडचिरोली जिल्ह्यात "जलतारा" योजनेच्या अंमलबजावणीबाबत

(१२) * ३७८१८ श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात 'एल निनो' च्या प्रभावामुळे यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता वर्तविण्यात आल्याने भविष्यात पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून, त्यावर उपाय म्हणून जिल्ह्यात 'जलतारा' योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात खड्डे खोदण्याचे नियोजन करण्यात आले असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील भूजल पातळी झपाट्याने कमी होत असल्याने विहिरी कोरड्या पडणे, शेती व पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होणे यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर 'जलतारा' योजनेंतर्गत जिल्ह्यात किती खड्डे खोदण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात येत असून या योजनेसाठी निधी मंजूर करण्यासह सदर लाभार्थी शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भरत गोगावले : (१) जलतारा योजनेंतर्गत मागणीनुसार लेबर बजेटमध्ये ९४ ग्रामपंचायतीमध्ये १८९ जलताराची कामे घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

(२) अशा स्वरूपाची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) जलतारा योजनेंतर्गत जिल्ह्यात जलतारा खोदण्याचे विशिष्ट उद्दिष्ट ठेवण्यात आलेले नाही. तथापि, गडचिरोली जिल्हा परिषद मधील ग्रामपंचायत यंत्रणेमार्फत जलतारा योजनेंतर्गत मागणीनुसार लेबर बजेटमध्ये ९४ ग्रामपंचायतीमध्ये १८९ जलताराची कामे प्रस्तावित असून ग्राम पंचायतीकडून प्रस्ताव प्राप्त होताच सदर कामांना मंजूरी देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

डोंबिवली (जि .ठाणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या परिसरातील धोकादायक कंपन्या स्थलांतरित करण्याबाबत

(१३) * ४०३३६ श्री.आदित्य ठाकरे (वरळी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि. ठाणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) परिसरात मोठया प्रमाणात असलेल्या रासायनिक कंपन्या या लोकवस्तीत असून त्याठिकाणी वारंवार होणारे स्फोट,अपघात लक्षात घेता या धोकादायक कंपन्या तत्काळ स्थलांतरित करण्याबाबतचा निर्णय तत्कालीन शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या स्थलांतरीत कंपन्यांच्या जागेचा वापर वाणिज्य कारणासाठी करुन याठिकाणी ग्रोथ सेंटरचा काही भाग वर्ग करावा तसेच आयटी कंपन्या सारख्या रोजगार निर्मिती करणाऱ्या कंपन्या या ठिकाणी सुरु केल्याने रोजगार उपलब्ध होईल अशी मागणी लोकप्रतिनिधीमार्फत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत : (१) होय हे खरे आहे.

दि.२८/०५/२०२४ रोजीच्या बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने शासन निर्णय, दिनांक २८/०५/२०२४ अन्वये प्रधान सचिव (उद्योग) यांचे अध्यक्षतेखाली कृती आराखडा समिती (Action Plan) स्थापन करण्यात आली आहे. तसेच कृती आराखडा समितीच्या दि.३१/०५/२०२४ रोजीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील अति धोकादायक व धोकादायक रासायनिक कारखान्यांचे उत्पादन स्थलांतरीत करणे तसेच विनापरवाना कारखाने बंद करण्याबाबत मऔवि महामंडळ कार्यालयीन आदेश दि.३१/०५/२०२४ अन्वये क्षेत्रीय सर्वेक्षण समिती गठित करण्यात आली आहे.

(२) व (३) कृती आराखडा समितीने वेळोवेळी घेतलेल्या बैठकांमध्ये दिलेल्या निर्देशांनुसार क्षेत्रीय सर्वेक्षण समितीने डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील अति धोकादायक व धोकादायक रासायनिक कारखान्यांचे सर्वेक्षणाचे काम संयुक्तपणे औद्योगिक क्षेत्रातील रहिवासी क्षेत्रापासून ५० मी. अंतरापर्यंत, १०० मी. अंतरापर्यंत व १०० मी. अंतरापुढे असलेल्या उद्योगांचे सविस्तर सर्वेक्षण प्रत्यक्ष जागेवर जाऊन पूर्ण केले आहे.

सदर सर्वेक्षणा दरम्यान धोकादायक व अति धोकादायक इत्यादी उद्योगांची वर्गवारी पूर्ण केली आहे. काही भूखंडधारकांनी रासायनिक उत्पादनाऐवजी माहिती आणि तंत्रज्ञान या वापराकरीता मऔवि महामंडळाकडून परवानगी घेतलेली असून, सदर भूखंडावरील रासायनिक उद्योग बंद केले आहेत. भविष्यात अशा घटना टाळण्याच्या दृष्टीकोनातून म.औ.वि. महामंडळाच्या डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील अति धोकादायक उद्योग स्थलांतरीत करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

तसेच, क्षेत्रीय सर्वेक्षण समितीने सर्वेक्षण पूर्ण करुन सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने शासनस्तरावर आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

थॅलेसेमिया रुग्णांसाठी आवश्यक डेसिरॉक्स औषधाचा पुरवठा करणेबाबत

(१४) [*] **३६००१ श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा रुग्णालयासह काही शासकीय रुग्णालयांमध्ये थॅलेसेमिया रुग्णांसाठी अत्यावश्यक असलेल्या 'डेसिरॉक्स' औषधाचा तुटवडा निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे ठाणे जिल्ह्यातील सुमारे ७५० हून अधिक थॅलेसेमिया रुग्ण औषधापासून वंचित राहिले असून नियमित 'डेसिरॉक्स' औषध न मिळाल्यास रुग्णाच्या हृदय, यकृत व मूत्रपिंडांवर गंभीर परिणाम होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरी अभावी सदर औषध खरेदी प्रक्रिया प्रलंबित असल्याने औषधांचा तुटवडा निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार भविष्यात अत्यावश्यक औषधांचा तुटवडा निर्माण होऊ नये यासाठी औषध खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता, वेळबद्ध मंजुरी व्यवस्था व आपत्कालीन साठा उपलब्ध ठेवण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) थॅलेसेमिया हा रक्ताचा अनुवंशिक आजार असून आई वडिलांमार्फत त्यांच्या मुलांना या आजाराचा प्रसार होत असतो. थॅलेसेमिया आजारामध्ये शरीरात हिमोग्लोबीन तयार होण्याचे प्रमाण अत्यल्प असते. त्यामुळे या रुग्णांस वारंवार रक्त संक्रमण करावे लागते. वारंवार रक्त संक्रमण केल्यामुळे शरीरातील लोहाचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढते. हे वाढलेले लोह शरीरातील सर्व अवयवांमध्ये जमा होऊन अवयवांचे काम बाधित करते. त्यामुळे या रुग्णांना रक्तातील लोह कमी करण्यासाठी Iron Chelation औषधांचा वापर नियमीत करावा लागतो. जिल्हास्तरावर सन २०२५-२६ मध्ये वितरीत करण्यात आलेल्या निधीतून Iron Chelation औषधांची खरेदी जिल्हास्तरावर करण्यात आली असून रुग्णांना औषधे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

सन २०२५-२६ च्या NHM PIP मधुन ठाणे जिल्हयाकरिता राज्यस्तरावरुन उपलब्ध झालेल्या अनुदानातून Tab Desirox खरेदी झालेली आहे. सद्य:स्थितीमध्ये जिल्हा रुग्णालय ठाणे येथे Tab Desirox ५००mg च्या एकूण ७०५० गोळया व मध्यवर्ती रुग्णालय उल्हासनगर येथे Tab Desirox ५००mg च्या एकूण १७०० गोळया उपलब्ध आहेत. पुढील कालावधीसाठी लागणाऱ्या आवश्यक Tab/गोळया खरेदी प्रक्रिया चालू करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

जव्हार (जि.पालघर) येथील पतंगशहा कुटीर रुग्णालयात दर्जेदार आरोग्य सुविधा मिळणेबाबत

(१५) [*] **४०११८ श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) येथील पतंगशहा कुटीर रुग्णालयात मुलभूत आरोग्य सुविधांचा अभाव व वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयातील अतिदक्षता विभाग (आयसीयू) बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, रुग्णालयातील लिफ्ट गेल्या अनेक दिवसांपासून बंद असल्यामुळे गर्भवती महिला, वृध्द नागरीक, गंभीर रुग्णांना त्यांच्या नातेवाईकांना उचलनू पायऱ्या चढून न्यावे लागत असल्याने रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक नागरीकांच्या शिष्टमंडळाने वैद्यकीय अधीक्षक कार्यालयाला भेट देऊन रुग्णालयातील विविध समस्या त्वरीत मार्गी लावण्याची मागणी दिनांक २३ मे, २०२६ रोजी वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त रुग्णालयातील मूलभूत आरोग्य सुविधांकडून दुर्लक्ष करणाऱ्या संबधितांवर अधिकारी /कर्मचाऱ्यांवर कारवाई करणेसह रुग्णांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) हे खरे नाही.
(२) सद्य:स्थितीत उपजिल्हा रुग्णालय जव्हार १०० खाटांचे रुग्णालय कार्यन्वित आहेत.
कुटीर रुग्णालय जव्हारचे २०० खांटाच्या रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. मात्र, जागेअभावी २०० खाटांचे सामान्य रुग्णालय कार्यन्वित करण्यात आले नसल्याने अतिदक्षता विभाग (आयसीयु) अद्याप कार्यन्वित करण्यात आलेला नाही.
(३) उपजिल्हा रुग्णालय जव्हार येथील लिप्ट काही कालावधीसाठी तांत्रिक बिघाड झाल्याने बंद होती. त्याची रितसर दुरुस्ती करण्यात येवून सद्य:स्थितीत लिफ्ट कार्यन्वित करण्यात आलेली आहे.
उपजिल्हा रुग्णालय जव्हार येथील प्रसुती गृह/शस्त्रकिया गृह / व ANC, PNC WARD, गंभीर रुग्ण आणि वृध्द रुग्ण यांचे कक्ष हे तळमजल्यावर कार्यन्वित आहेत. त्यामुळे रुग्णालयात येणाऱ्या गर्भवती महिला, वृध्द नागरीक, गंभीर रुग्णांना त्यांच्या नातेवाईकांना उचलून पायऱ्या चढून न्यावे लागत नाही परंतु गंभीर रुग्ण व वृध्द रुग्ण यांना गरज पडल्यास लिफ्टने पहिल्या मजल्यावर शिफ्ट करण्यात येते.
(४) हे खरे आहे.
(५) उपजिल्हा रुग्णालय जव्हार येथे प्रसुतीगृह, एसएनसीयू, एनआरसी, शस्त्रक्रिया गृह, प्रयोगशाळा, क्ष- किरण सेवा, ईसीजी, ब्लड बँक, डायलिसीस, नेत्र विभाग इ. आरोग्य सेवा सुविधा उपलब्ध आहेत. तसेच सदर रुग्णालयात ७ रुग्णवाहीका सद्य:स्थितीत कार्यरत आहेत. रुग्णालयात औषधसाठा, वैद्यकीय यंत्रसामुग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.
उपजिल्हा रुग्णालय जव्हार येथील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत रुग्णालयातील उपलब्ध वैद्यकीय साधनसामुग्री व उपकरणे, औषधसाठा याचा आवश्यकतेनुसार वापर करुन रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना प्राथमिक व द्वितीय स्तरावरील आवश्यक त्या सर्व वैद्यकीय सुविधा तातडीने उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. कोणताही रुग्ण मूलभूत आरोग्य सेवेपासून तसेच सुविधांपासून वंचित राहिलेला नाही. सबब अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

औराद शहाजानी (जि.लातूर) येथील ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरणेसह आरोग्य सुविधा पुरविणेबाबत

(१६) * ३६८४९ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औराद शहाजानी (जि.लातूर) येथील ग्रामीण रुग्णालयात जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने आयोजित कुटुंब नियोजन शिबिरामध्ये शस्त्रक्रिया झालेल्या महिला रुग्णांना बेड न देता थेट जमिनीवर सतरंजी आणि गादी टाकून झोपविण्यात आले असल्याचे दिनांक ३१ मार्च,२०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिबिराचे उद्घाटन राजकीय नेत्यांच्या हस्ते करण्याच्या अट्टाहास व शस्त्रक्रिया करणारे डॉक्टर वेळेत न आल्यामुळे महिला रुग्णांना सकाळपासून संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत उपाशीपोटी ताटकळत ठेवण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी "बिनटाक्याच्या शस्त्रक्रियेनंतर रुग्णांना त्रास होऊ नये म्हणून बेडऐवजी मुद्दाम जमिनीवर झोपविले जाते", असे अत्यंत बेजबाबदार आणि वैद्यकीय शास्त्राला न पटणारे समर्थन केल्यामुळे प्रशासनाकडून अपुऱ्या पायाभूत सुविधा मिळत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर ग्रामीण रुग्णालय मंजूर होऊन आणि त्याचे बांधकाम पूर्ण होऊन तब्बल १० वर्षे उलटली, तरीही शासनाकडून अद्याप तेथे आवश्यक कर्मचारी भरती करण्यात आली नाही व वैद्यकीय अधीक्षक नियमित भेटी देत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार या प्रकरणात महिला रुग्णांना अमानवीय वागणूक देणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर व डॉक्टरांवर कारवाई करणेसह सदर ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे आणि आवश्यक त्या आरोग्य सुविधा पुरविण्याबबात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) होय, हे खरे आहे.

सदर शिबीरात एकूण २१ लाभार्थीवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या होत्या, परंतु उपलब्ध खाटा कमी असल्याने जमीनी वर साफ सफाई करुन सतरंजी व त्यावर गादया टाकून लाभार्थीची सोय करण्यात आली होती.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशतः खरे आहे,

याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा लातूर यांनी संबधित वैद्यकीय अधिकाऱ्यास कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा घेतला असता त्यांच्या लेखी खुलाश्यानुसार सदर विधान हे अनावधानाने झाले असुन यापुढे असे होणार नाही याबाबत दक्षता घेतली जाईल असे त्यांच्या लेखी खुलाश्यात नमुद केले आहे. तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी, कार्यालय जिल्हा परिषद, लातूर कडून संबंधित वैदयकीय अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात आली आहे.

(४) औराद शहाजानी, जि. लातूर येथे प्रा. आ. केंद्राचे श्रेणीवर्धन होवून नवीन ग्रामीण रुग्णालय मंजूर झाले असुन सदर रुग्णालयाचे बांधकाम पुर्ण होऊन इमारत जिल्हा शल्य चिकित्सक लातूर यांच्या ताब्यात घेण्यात आली आहे. औराद शहाजानी करीता नियमित १० पदे व काल्पनीक कुशल १३ पदे व काल्पनीक अकुशल ०२ पदे अशी एकूण २५ पदे मंजूर करण्यांत आलेली असून त्यापैकी नियमित ०९ पदे भरलेली व ०१ पद रिक्त आहे. काल्पनीक

कुशल/अकुशल १५ पदे भरण्याची प्रक्रिया चालू आहे. तसेच वैद्यकीय अधिक्षक नियमित भेटी देत नाही, हे खरे नाही.

(५) सदर प्रकरणी चौकशीचा व डॉक्टरांवर कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

केंद्र आणि राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सर्व कार्यक्रम राबविण्यात येत असून त्यानुसार आवश्यक सोई-सुविधा वेळोवेळी पुरविण्यात येतात. राज्यतील सर्वच प्रा. आ. केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व जिल्हा रुग्णालय येथे आवश्यक मनुष्यबळ भरणे करीता कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात “जपानी मेंदूज्वर” या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी करावयाची उपाययोजना

(१७) * ३८३९२ अॅड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात “जपानी मेंदूज्वर” या संसगर्जन्य आजाराचा प्रसार मोठया प्रमाणावर होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भ/मराठवाडा भागामध्ये या आजाराचे प्रमाण अधिक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आजाराबाबत जनजागृती आणि लसीकरण मोठया प्रमाणात होण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन या आजारावर नियंत्रण मिळविण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) हे खरे नाही.

क्युलेक्स डासापासून या रोगाचा प्रसार होतो. राज्यातील जिल्हानिहाय जपानी मेंदूज्वर (Japanese Encephalitis) मागील तीन वर्षाची माहिती

जिल्हे	२०२३		२०२४		२०२५		मे २०२६ अखेर	
	रुग्ण	मृत्यू	रुग्ण	मृत्यू	रुग्ण	मृत्यू	रुग्ण	मृत्यू
नागपूर	२	०	२	२	७	१	३	०
भंडारा	१	०	२	२	०	०	०	०
चंद्रपूर	२	०	०	०	०	०	०	०
गडचिरोली	०	०	१	०	०	०	१	०
एकूण राज्य	५	०	५	४	७	१	४	०

(२) हे अंशत: खरे आहे.

विदर्भ विभागात भातशेतीचे मोठे क्षेत्र, पावसाळ्यात डासांची वाढ, डुकरे व जलपक्षी यांचा वावर, ग्रामीण-आदिवासी लोकसंख्या, तसेच पूर्वी जपानी मेंदूज्वर रुग्ण व उद्रेकांची नोंद झालेली असल्याने हा विभाग जपानी मेंदूज्वराच्या दृष्टीने संवेदनशील मानला जातो. विशेषत: गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, नागपूर व वर्धा हे जिल्हे जपानी मेंदूज्वर या आजाराकरिता उच्च जोखीम ग्रस्त जिल्हे आहेत. यामुळे राज्यातील विदर्भ विभाग जपानी मेंदूज्वरच्या दृष्टीने संवेदनशील आहे.

(३) जपानी मेंदूज्वरचा प्रादुर्भाव असलेल्या जिल्ह्यांमध्ये Japanese Encephalitis लस सुरू करण्याबाबत केंद्र सरकारचे धोरण खालीलप्रमाणे आहे:-

जपानी मेंदूज्वरचा प्रादुर्भाव असलेल्या जिल्ह्यांमधील १ ते १५ वयोगटातील सर्व मुलांसाठी नियमित लसीकरण (Routine Immunization) कार्यक्रमात Japanese Encephalitis लसीचे दोन डोस समाविष्ट करणे, ज्यामध्ये पहिला डोस ९ ते १२ महिन्यांच्या वयोगटात आणि दुसरा डोस १६ ते २४ महिन्यांच्या वयोगटात दिला जातो.

प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून राज्यात राबविण्यात आलेल्या Japanese Encephalitis लसीकरण मोहिमेमध्ये वर्षनिहाय नव्याने समाविष्ट करण्यात आलेले जिल्हे खालीलप्रमाणे असून, सध्या एकुण १६ जिल्हे व ८ महानगरपालिका (पुणे, पिं.चिंचवड, सोलापूर, परभणी, लातूर, अमरावती, चंद्रपूर, पनवेल) क्षेत्रात या आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लसीकरण केले जाते:-

वर्ष	जिल्हे
२००७	अमरावती, नागपूर (ग्रामीण) आणि भंडारा
२००८	यवतमाळ
२००९	बीड,गडचिरोली,वाशिम आणि लातूर
२०१४	गोंदिया
२०२१	सोलापूर, धाराशिव, चंद्रपूर आणि वर्धा
२०२५	रायगड, पुणे, परभणी

वरील जिल्हयात/महानगरपालिका क्षेत्रात या आजाराबाबत तसेच लसीकरणाच्या अनुषंगाने आवश्यक जनजागृती केली जाते.

(४) राज्यात “जपानी मेंदूज्वर” (JE) या आजारावर नियंत्रण व प्रतिबंध होण्याच्या दृष्टीने खालील उपाययोजना केल्या जातात:-

- या आजाराच्या निदानासाठी ५ निवडक ‘सेंटिनेल सेंटर्स’ (Sentinel Centers) कार्यरत आहेत.
- जपानी एन्सेफलायटिसच्या उपचारासाठी १६ संवेदनशील जिल्ह्यांमध्ये बालकांसाठी अतिदक्षता विभाग (Pediatric Intensive Care Units) कार्यरत आहेत.
- लक्षणे असलेल्या रूग्णांचे जपानी मेंदूज्वर या विषाणूच्या विलगीकरणासाठी (isolation) रक्तजल नमुने गोळा केले जातात.
- क्युलेक्स (Culex) गटातील डासांचे कीटकशास्त्रीय सर्वेक्षण करणे. (Entomological Surveillance).
- प्रभावित गावांमध्ये बाहेरच्या भागात (Outdoor) फॉगिंग (धूर फवारणी) करणे.
- IEC (माहिती, शिक्षण आणि संवाद): जपानी मेंदूज्वरची तीव्रता, स्वच्छता आणि डुकरांच्या संख्येवर नियंत्रण याबाबत आरोग्य शिक्षणाचा प्रचार व प्रसार केला जातो.
- डासांच्या नैसर्गिक डासोत्पत्ती स्थाने शोधण्यासाठी सर्वेक्षण आणि योग्य ठिकाणी अळीनाशक गप्पी मासे (Guppy fish) सोडले जातात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्ह्यातील विविध कारखान्यांमध्ये होत असलेले अपघात टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

(१८) * **४०९४५ श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील विविध कारखान्यांमधील अपघातामध्ये सुमारे ४३ कामगारांचा माहे जानेवारी, २०२५ मध्ये मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामगारांचा मृत्यू हा कारखान्यांमध्ये सुरक्षा यंत्रणेचा अभाव, कारखान्यांचे नियमित सेफ्टी ऑडिट न करता कारखाने सुरू ठेवण्यास संबंधित अधिकाऱ्यांनी परवानगी दिली असणे या कारणांमुळे झाला असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित अधिकारी व कारखान्यांचे मालक यांचेवर कारवाई करण्यासह भविष्यात असे अपघाती मृत्यू टाळण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आकाश फुंडकर :(१) हे अंशत: खरे आहे.

नागपूर जिल्ह्यात माहे जानेवारी, २०२५ मध्ये १ प्राणघातक अपघात झालेला यामध्ये एका कामगाराचा मृत्यू झाला होता तसेच सन २०२५ मध्ये १७ कारखान्यांमध्ये झालेल्या अपघातांच्या घटनांमध्ये एकुण ३३ कामगारांचा मृत्यू झालेला आहे.

(२) नागपूर जिल्ह्यात सन २०२५ मध्ये प्राणघातक अपघात झालेल्या सर्व कारखान्यांपैकी ज्या कारखान्यांना नियमाप्रमाणे बाह्य सुरक्षा सेफ्टी ऑडिट करणे अनिवार्य आहे, त्या सर्व कारखान्यांनी बाह्य सुरक्षा सेफ्टी ऑडिट केल्याची नोंद आहे.

(३) सर्व अपघातांची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून चौकशी करण्यात आली असुन आढळून आलेल्या कायदेभंगाबाबत कारखान्याचे भोगवटादारविरुध्द कायदेशीर कारवाई करुन अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर यांचे न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत. तसेच अपघातांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता कारखाना व्यवस्थापनास सुरक्षेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

"आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य" या योजनेंतर्गत कर्करोगतज्ज्ञांच्या पात्रतेच्या अटीमुळे रुग्णांच्या उपचारात अडचणी येत असल्याबाबत

(१९) * **३३१३४ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कर्करोगाच्या रुग्णसंख्येत सातत्याने वाढ होत असताना उपचार व्यवस्था मजबूत करण्याऐवजी "आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजने" अंतर्गत कर्करोगाच्या उपचारासाठी राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने मान्यताप्राप्त सुपरस्पेशालिटी पदवी अनिवार्य केल्यामुळे राज्यातील शेकडो कर्करोगतज्ज्ञ अपात्र ठरले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्करोग रुग्णांची वाढत असलेली संख्या आणि त्या प्रमाणात कर्करोगतज्ज्ञ उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांना आवश्यक ते उपचार उपलब्ध होऊ शकत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कर्करोग रुग्णांना "आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना" योजनेंतर्गत कर्करोग तज्ञांकडून आवश्यक उपचार उपलब्ध करून देण्याबबात कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने एकत्रित आयुष्यमान-भारत जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत कर्करोगाच्या उपचारासाठी मान्यताप्राप्त सुपरस्पेशालिटी पदवी अनिवार्य केल्याबाबत राष्ट्रीय आरोग्य प्राधिकारणाकडून मार्गदर्शक सूचना/ कार्यालयीन ज्ञापन प्राप्त झालेले नाही.
(२) राज्यात एकूण ५७३ कर्करोगतज्ञ डॉक्टरांची महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या अभिलेख्यावर नोंद आहे. कर्करोग रुग्णांना आवश्यक उपचार उपलब्ध व्हावेत याकरिता वैद्यकीय शिक्षण विभागामार्फत राज्यव्यापी त्रिस्तरीय कर्करोग सेवा धोरण जाहीर करण्यात आले असून त्या अंतर्गत एकूण १८ रुग्णालयांमध्ये कर्करोग निदान, किमोथेरपी, रेडिओथेरपी, शस्त्रक्रिया, संशोधन, प्रशिक्षण व अतिविशेषोपचार सुविधा टप्प्याटप्प्याने विकसित करण्यात येणार आहेत.

सद्य:स्थितीत शासकीय कर्करोग रुग्णालयांमधील कोणत्याही रुग्णांचे प्रस्ताव हे डी.एम. अथवा एम.सी.एच सुपरस्पेशलिटी पदवीका प्राप्त डॉक्टरांकडूनच अधिकृत करुन पाठवावेत अशी अट घालण्यात आलेली नाही व शासकीय कर्करोग रुग्णालयामध्ये प्रदीर्घ अनुभव असलेल्या डॉक्टरांना सदर योजनेंतर्गत उपचार करण्याची मान्यता आहे. त्यामुळे शासकीय कर्करोग रुग्णालयात तरी फक्त सुपरस्पेशलिस्टच्या नावावरच मंजुरी येते किंवा तांत्रिक कारणास्तव रुग्णांचे उपचार थांबल्याचे आढळून आलेले नाही.
(३) एकत्रित आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत कर्करोग रुग्णांकरिता सर्जिकल ऑन्कॉलॉजीसाठी १४७, मेडिकल ऑन्कॉलॉजीसाठी ३०८ आणि रेडिएशन ऑन्कॉलॉजीसाठी ६० उपचार उपलब्ध आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौजे भाताण (ता.पनवेल, जि.रायगड) येथील आकारीपड जमीन अमेटी विद्यापीठास देण्याच्या निर्णयाबाबत

(२०) * ४०५३१ श्री.महेश बालदी (उरण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे भाताण (ता.पनवेल, जि.रायगड) येथील आकारीपड जमीन अमेटी विद्यापीठास देण्याचा निर्णय राज्य मंत्री मंडळाने घेतला असल्याचे माहे जून, २०२६ मध्ये निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमीन गावठाण विस्तार सार्वजनिक सुविधा व क्रिडांगण व भविष्यातील विकास कामांसाठी राखीव ठेवण्याची मागणी ग्रामस्थांकडून सातत्याने करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निर्णय राज्य मंत्री मंडळात घेण्यापूर्वी ग्रामसभा, ग्रामपंचायत, स्थानिक शेतकरी व नागरिकांना विश्वासात घेण्यात आले होते काय,
(४) असल्यास, अमेटी विद्यापीठास सदर जमीन उपलब्ध करून देण्याच्या बदल्यात स्थानिक विद्यार्थ्यांना प्रवेशामध्ये प्राधान्य, शुल्क सवलत तसेच स्थानिक युवकांना रोजगाराबाबत अटी घालण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : (१) व (२) होय, हे खरे आहे.

मौजे भाताण, ता.पनवेल, जि.रायगड येथील स.न. ८/०, ९/२, १०/३, १३/५, १४/०, १६७/१, १७८/०, १८२/४ या आकारीपड जमिनीपैकी एकूण ६-०३-७० हे. आर हे क्षेत्र महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ व सरकारी जमिनींची विल्हेवाट लावणे नियम, १९७१ मधील तरतूदी तसेच शासन निर्णय दि.२५/०७/२०१९ व दि.३१/०७/२०२३ मधील तरतूदीनुसार रितनंद बलवेद एज्युकेशन फाऊंडेशन संस्थेला शैक्षणिक प्रयोजनासाठी कब्जेहक्काची रक्कम आकारून वर्ग-२ या धारणाधिकाराने प्रदान करण्यात आलेली आहे.

(३) सदर जमीन आकारीपड असल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही

शहापूर व मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील काळू नदीतील पाण्याचा स्रोत आटल्याने नळ पाणी योजना बंद पडण्याच्या अवस्थेत असल्याबाबत

(२१) * ३५२९२ श्री.दौलत दरोडा (शहापूर) : सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर व मुरबाड (जि. ठाणे) तालुक्यातील पाटबंधारे विभागाच्या अंतर्गत धरणांचे अतिरिक्त पाणी काळू नदीत सोडत नसल्याने काळू नदीतील पाण्याचा स्रोत आटला असून शासनाची नळ पाणी योजना बंद पडली असून टंचाईग्रस्त गावांना टँकरने पाणी पुरवठा करावा लागत असल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील धरणातील पाणी चोरी मोठ्या प्रमाणात होत असल्याच्या तक्रारींकडे विभागाचे अधिकारी दुर्लक्ष करीत असून वर्षानुवर्षे कॅनॉल व धरण दुरुस्तीच्या नावाखाली बनावट देयके काढली जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषी अधिकारी व ठेकेदार यांचे विरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश महाजन : (१) अशंत: खरे आहे.

भातसा धरणातून सोडलेल्या पाण्याचा प्रवाह वेगळा असल्याने काळू नदीत पाणी सोडता येत नाही. तसेच शहापूर व मुरबाड तालुक्यात लघु पाटबंधारे योजना येत असून, सर्व प्रकल्प द्वारविरहित आहेत. योजनांच्या पाणीसाठयातून मुख्यत्वे रब्बी हंगामात सिंचन करिता पाण्याचा वापर करण्यात येतो. रब्बी हंगाम पूर्ण झाल्यानंतर शिल्लक पाणीसाठ्याचे नियोजन करून उन्हाळी हंगामात सिंचना करिता वापर करण्यात येतो. सदर लघु पाटबंधारे योजनामंध्ये माहे मे अखेर २० ते २५% पाणीसाठा शिल्लक राहतो. उन्हाळयात काळू नदी लगत मौजे नांदवळ व गेगाव परीसरातून स्थानिकाकडून काळू नदीत पाणी सोडणे बाबतीत मागणी केली जाते. परंतु या परिसरापासून मानिवली, खराडे. आदिवली, वेल्होळी, खांडपे हे लघु प्रकल्प आहेत. सदर प्रकल्प काळू नदीपासून २० किमी ते ३५ किमी अंतरावर असल्याने पाण्याचा वहननाश मोठ्या प्रमाणात होवू शकेल व मुळातच उन्हाळयात शिल्लक पाणीसाठा २० ते ३०% दरम्यान असल्याने मोठ्या प्रमाणात पाणी नाश होऊ शकतो. तसेच सद्य:स्थितीत एल निनो परिस्थितीच्या पार्श्वभुमीवर धरणातील पाणी केवळ पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवण्यात आलेले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. त्याचबरोबर जिल्हा परिषद, ठाणे यांच्या दि. २९/०६/२०२६ रोजीच्या टँकर अहवालानुसार शहापूर तालुक्यातील ४१ गावे व १४० पाड्यांना ४४ टँकरद्वारे तसेच मुरबाड तालुक्यातील ८ गावे व १५ पाड्यांना ४ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

धरणांतून पाणीचोरीची कुठलीही तक्रार प्राप्त नसून धरण दुरुस्ती व कालवा दुरुस्तीची कामे आवश्यकतेनुसार वेळोवेळी केली जातात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात ‘इबोला’ (बुन्डिबुग्यो स्ट्रेन) विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना

(२२) * ३९९०६ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आफ्रिकी देशांमध्ये आढळलेला इबोला विषाणूच्या नव्या व घातक अशा “बुन्डिबुग्यो स्ट्रेन”च्या प्रादुर्भावामुळे जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) आंतरराष्ट्रीय स्तरावर ‘सार्वजनिक आरोग्य आणिबाणी’ घोषित केली असून केंद्र शासनाच्या आदेशानंतर नागपूर विमानतळ हायअलर्टवर आले असल्याचे माहे मे, २०२६ च्या अखेरच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर व विदर्भातील इतर आंतरराष्ट्रीय/देशांर्गत संपर्क असलेल्या विमानतळांवर व रेल्वे स्थानकांवर आफ्रिकी देशांतून येणाऱ्या संशयित प्रवाशांच्या थर्मल स्क्रीनिंग आणि विशेष तपासणीसाठी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबबात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार इबोला विषाणूचा राज्यात प्रादुर्भाव होऊ नये यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग, संबधित महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासन यांच्यात समन्वय करणे, शासकीय रुग्णालयांमध्ये विशेष आयसोलेशन वॉर्ड आणि उपचारासाठी आवश्यक साधनसामग्रीची व्यवस्था करणे तसेच मार्गदर्शक नियमावली (SOP) जारी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) हे खरे आहे.

राज्यामध्ये इबोला विषाणूच्या नव्या व घातक अशा “बुन्डिबुग्यो स्ट्रेन” च्या प्रादुर्भावामुळे जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) आंतरराष्ट्रीय स्तरावर ‘सार्वजनिक आरोग्य आणिबाणी’ घोषित केली असून त्यानुषंगाने राज्यामध्ये सर्व विमानतळावर हाय अलर्ट घोषित करण्यात आला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) इबोला विषाणूचा राज्यात प्रादुर्भाव रोखण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत संबधित महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासन यांच्या समन्वयाने संचालक (प्राथमिक), आरोग्य सेवा, पुणे या ठिकाणी साथरोग नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर नियंत्रण कक्षास जिल्हास्तरावरील स्थापित नियंत्रण कक्षाकडून दैनंदिन माहिती फोनद्वारे घेतली जाते.

तसेच कस्तुरबा रुग्णालय, मुंबई, नायडू हॉस्पिटल, पुणे व एम्स हॉस्पिटल, नागपूर या ठिकाणी विशेष आयसोलेशन वॉर्ड आणि उपचारासाठी आवश्यक साधनसामग्रीची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच इबोलाबाबत मार्गदर्शक नियमावली (SOP) तयार करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

बीड जिल्हा रुग्णालयात रक्त तपासणीसाठी व विविध तपासण्यांसाठी "न्युक्लिक ॲसिड चाचणी" ही मशीन उपलब्ध करणेबाबत

(२३) * ४१०२७ श्री.संदिप क्षीरसागर (बीड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रक्त तपासणीसाठी व विविध तपासण्यांसाठी न्युक्लिक ॲसिड चाचणी (Nucleic Acid Testing (NAT) system Machine) या मशीनचा मोठ्या प्रमाणात उपयोग होत असुन अनेक शासकीय रुग्णालयात सदर मशिन खरेदी करण्यात आलेली असून तिचा योग्य वापर होत असल्याचे वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञांचे मत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड विधानसभा मतदार संघामध्ये ५०० खाटांचे शासकीय जिल्हा रुग्णालय कार्यान्वित असून बहुतांश ग्रामीण व शहरी भागातील नागरीक येथे उपचार घेतात परंतु तेथे सदर मशिन बसविण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मशीन बीड जिल्हा रुग्णालयात बसविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी शासनाकडे व जिल्हा नियोजन समितीकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बीड जिल्हा रुग्णालयाला सदरील मशीन उपलब्ध करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर मशीन बीड जिल्हा रुग्णालयाकरीता उपलब्ध करण्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक, बीड यांनी जिल्हाधिकारी बीड तथा जिल्हा नियोजन समिती बीड यांच्याकडे मागणी केलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेमधील त्रुटी दूर करणेबाबत

(२४) * ३७६०५ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील उंडणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात एकूण ९ पैकी २ कर्मचारी हजर रहाणे , काही कर्मचारी हजेरीपटावर स्वाक्षरी करून केंद्रात उपस्थित नसणे, रुग्ण नोंदणी रजिस्टर व औषध वितरण नोंदी योग्य प्रकारे न ठेवणे, ऑपरेशन थिएटरमधील छत गळत असणे, अपुरा प्रकाश व वीज नसणे यामुळे पर्यायी साधनांवर उपचार करावे लागत असणे यासारख्या गंभीर बाबी निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, जिल्हयातील धावडा (ता.सिल्लेड) येथील आमठाणा प्राथमिक उपकेंद्राच्या १० वर्षांपूर्वी बांधून पूर्ण झालेल्या इमारतीत कर्मचारी नेमणूक न झाल्याने सदर उपकेंद्र कार्यान्वित झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, वैद्यकीय घातक (बायोमेडिकल वेस्ट) कचऱ्याची विल्हेवाट अधिकृत यंत्रणेमार्फत वैज्ञानिक पद्धतीने लावणे बंधनकारक असताना जिल्हयातील आडगाव-माहोली परिसरातील डोंगररस्त्यावर मोठ्या प्रमाणात वैद्यकीय घातक कचरा (बायोमेडिकल वेस्ट) उघड्यावर टाकण्यात येत असल्याने तेथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असून संसर्गजन्य रोग पसरण्याची शक्यता वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उंडणगाव प्राथमिक आरोग्य केंद्रातील गैरहजेरी, सुविधांची कमतरता व प्रशासकीय हलगर्जीपणा दूर करणे, धावडा येथील आरोग्य उपकेंद्र कार्यान्वित करणे

तसेच वैद्यकीय घातक (बायोमेडिकल वेस्ट) कचऱ्याची विल्हेवाट अधिकृत यंत्रणेमार्फत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) हे अंशतः खरे आहे.

जि.प.सदस्य, छत्रपती संभाजीनगर यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र, उंडणगाव, ता.सिल्लोड येथे केलेल्या पाहणीदरम्यान २ वैद्यकीय अधिकारी पूर्वपरवानगीशिवाय गैरहजर असल्याचे तसेच तेथील ओपीडी (OPD) नोंदणी रजिस्टर गेल्या ८ महिन्यांपासून अपूर्ण असल्याचे आढळून आले होते. तथापि, लॅब टेक्निशियनकडील सर्व रजिस्टर्स आणि लॅबोरेटरी रेकॉर्ड्स अद्ययावत असल्याचे निदर्शनास आले होते. तसेच प्रा.आ.केंद्राची इमारत आणि ऑपरेशन थिएटर जीर्ण झाले असल्याचे आढळून आले होते.
(२),(३) व (४) धावडा उपकेंद्राची इमारत जीर्ण असल्याने तेथील उपकेंद्र शेजारील शासकीय इमारतीमध्ये कार्यान्वित असून उपकेंद्रांमार्फत नियमित रुग्णसेवा देण्यात येत आहे.

तसेच, सदर उपकेंद्रात समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक, आणि आशा स्वयंसेविका या कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

आडगाव-माहोली, ता.जि.छत्रपती संभाजीनगर येथे आढळून आलेल्या खाजगी वैद्यकीय व्यवस्थापनेचा औषधसाठा व जळालेल्या औषधी कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याबाबत वैद्यकीय अधिकारी यांनी अन्न व औषध प्रशासन अधिकारी, ता.जि.छत्रपती संभाजीनगर व व्यवस्थापक, महाराष्ट्र इनव्हायरो प्रा. लि. यांना कळविण्यात आले आहे.

प्रा.आ.केंद्र, उंडणगाव येथील विनापरवानगी गैरहजर वैद्यकीय अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून सदर प्रा.आ.केंद्र व उपकेंद्र, धावडा येथील कर्मचाऱ्याऱ्यांना बायोमेट्रिक उपस्थिती दर्शविण्याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांनी सक्त सूचना दिल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील प्रत्येक जिल्हयात “एक पुस्तकाचे गांव” निर्माण करणेबाबत

(२५) * ३३४१७ श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अशोकराव माने (बापू) (हातकणंगले), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सचिन पाटील (फलटण) : सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रत्येक जिल्हयात “एक पुस्तकाचे गांव” निर्माण करण्याचा शासनाने निर्णय घेऊनही सिंधुदूर्ग, रत्नागिरी व गोंदिया या जिल्हयाव्यतिरिक्त उर्वरित ३१ जिल्हयांमध्ये अद्यापही या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान या जागतिक पुस्तक दिनाच्या निमित्ताने घेतलेल्या आढाव्यातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भातील शासन निर्णय (GR) दिनांक ४ जानेवारी २०२२ रोजी निर्गमित होऊनही राज्यातील ३४ जिल्ह्यांपैकी केवळ ३ जिल्ह्यांत (पोंभुर्ले, मालगुंड आणि नवेगाव बांध) या योजनेचे काम अंशतः सुरू झाले असून, उर्वरित ३१ जिल्ह्यांत ही योजनेवर अद्यापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, अंबाजोगाई (जि. बीड) शहराला ‘पुस्तकांचे गाव’ योजना विस्तार प्रकल्पामध्ये सहभागी करून घेण्यासाठी आवश्यक निकष, अटी व शर्तीबाबतचा नमुना आराखड्यातील १ ते ८ अन्वये परिपूर्ण माहिती संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई. यांचेकडे सादर करण्यात आली असून या शहराचा ‘पुस्तकांचे

गाव' योजनेत समावेश करून प्रतीक्षाधीन सर्वकश शासन निर्णय निर्गमित करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मराठी भाषा मंत्री यांचेकडे दिनांक २७ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वाचन संस्कृती जोपासण्यासाठी आणि मराठी भाषेच्या संवर्धनासाठी ही संकल्पना राज्यभर राबवण्याचे निश्चित केले असताना, प्रशासकीय उदासीनता आणि जागा उपलब्ध न होण्यासारख्या तांत्रिक कारणांमुळे या महत्त्वाकांक्षी योजनेची गती मंदावली आहे. तसेच, सदरहू उर्वरित ३१ जिल्हयामध्ये या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची सद्य:स्थिती काय आहे,

(५) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्यातील सर्व जिल्ह्यांत ही योजना कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणते नियोजन केले आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत : (१) व (२) होय, अंशत: खरे आहे.

सिंधुदुर्ग, रत्नागिरी व गोंदिया या ३ जिल्हयांव्यतिरिक्त बाकी जिल्हयांमध्ये पुस्तकाचे गांव उभारणीची प्रक्रिया सुरु आहे.

मराठी भाषेचा विकास, प्रचार, प्रसार, संवर्धन व वाचन संस्कृतीची जोपासना व्हावी या दृष्टीने पुस्तकाचे गांव भिलार या योजनेच्या यशाच्या पार्श्वभूमीवर मराठी भाषा विभागाच्या दिनांक ०४/०१/२०२२ च्या शासन निर्णयान्वये पुस्तकांचे गांव ही योजना संपुर्ण महाराष्ट्रात विस्तारित स्वरुपात करण्यात आली आहे. मराठी भाषा विभागाच्या दिनांक २५/०३/२०२२ च्या शासन निर्णयान्वये या योजनेमधील पहिल्या टप्प्यात औरंगाबाद महसूल विभाग, नागपूर महसूल विभाग, कोकण विभाग महसूल विभाग व पुणे महसूल विभाग या ०४ महसूली विभागातून अनुक्रमे वेरुळ, ता.खुलताबाद, जिल्हा छ. संभाजीनगर, नवेगांव बांध ता.अर्जुनी मोरगांव, जि.गोंदिया, पोंभुर्ले, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग व अंकलखोप (औदुंबर) ता.पलुस, जि.सांगली ही ०४ गावे निश्चित करण्यात आली आहेत. तसेच, तदनंतर मराठी भाषा विभागाच्या दिनांक २०/०८/२०२४ च्या शासन निर्णयान्वये पुस्तकांचे गांव योजना विस्तार अंतर्गत नाशिक महसूल विभागातील अमळनेर, जिल्हा जळगांव येथे पुस्तकाचे गांव निर्माण करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे.

त्यानंतर शासन निर्णय दिनांक ३०/०१/२०२६ अन्वये पुस्तकांचे गांव /कवितांचे गांव ही योजना विस्तारित स्वरुपात राज्यात सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

मा.नमिता मुंदडा, विधानसभा सदस्य, २३२-केज, जि.बीड यांनी दिनांक २७/०४/२०२६ च्या पत्रान्वये अंबजोगाई (जि. बीड) शहाराला पुस्तकाचे गाव घोषित करण्याबाबतची मागणी केली आहे. राज्यातील सर्व जिल्हयात एक पुस्तकांचे गांव निर्माण करणेबाबत सर्वसमावेशक शासन निर्णय दिनांक ३० जानेवारी, २०२६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार त्यात नमुद केलेली निवडप्रक्रिया, अटी, शर्तीयाबाबतची तपासणी करण्याबाबत अपर जिल्हाधिकारी तथा समन्वयक अधिकारी पुस्तकांचे गांव, जि.बीड यांना दिनांक २१/०५/२०२६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. या अनुषंगाने जिल्हा मराठी भाषा समिती यांचा अहवाल व शिफारस येथे प्रतिक्षाधीन आहे. ती प्राप्त झाल्यावर अंबाजोगाई या गावात पुस्तकाचे गांव उभारण्याचे काम हाती घेता येईल. त्यानुसार मा.नमिता मुंदडा, विधानसभा सदस्य यांना मा.मंत्री (मराठी भाषा) यांच्या स्वाक्षरीने दिनांक १५/६/२०२६ रोजीच्या पत्रान्वये वस्तुस्थिती कळविण्यात आली आहे.

(४) हे खरे नाही.

सदर बाब ही प्रशासकीय उदासिनता नसून हा प्रकल्प ग्रामस्थांच्या सहभागातून करावयाचा आहे. ग्रामस्थांनी कुठल्याही आर्थिक लाभाची अपेक्षा न करता स्वेच्छेने आपल्याकडील किमान १५० चौ.फुट एवढी जागा उपलब्ध करुन देणे अभिप्रेत आहे. शासनाचे याबाबतचे निर्देश स्पष्ट असून दिनांक ४/०१/२०२२ रोजीच्या शासन निर्णयात पहिल्या टप्प्यात पुस्तकाचे गाव विभागीय स्तरावर सहा महसुली विभागात सुरु करावे व त्यानंतर टप्प्याटप्प्याने संपूर्ण राज्यात पुस्तकांचे गाव सुरु करावे असे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार शासनमान्य गावामध्ये पुस्तकाचे गाव विस्तार या योजनेतंर्गत पुढील कार्यवाहीसाठी सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांना दिनांक ०७/०४/२०२६ रोजी पत्र पाठविण्यात आले आहे. ज्या उर्वरित जिल्हयांमधुन पुस्तकाचे गाव ही योजना राबवायची आहे त्या सर्व जिल्हाधिकारी यांना आवश्यक कार्यवाहीसाठी दिनांक २४/०४/२०२६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच जिल्हा मराठी भाषा समिती यांच्याकडून गावाची प्राथमिक निवड करुन तशी शिफारस पाठविणे आवश्यक आहे.

(५) चौकशीचा प्रश्नच उद्‌भवत नाही. शासनाने सदरची योजना कालबध्द पध्दतीने पूर्ण करण्यासाठी आर्थिक रकमेची तरतुद केली आहे. जिल्हाधिकारी, जिल्हा मराठी भाषा समिती यांच्याकडून शिफारशीसह प्रस्ताव प्राप्त झाल्यावर त्या त्या गावांमध्ये पुस्तकांचे गाव उभारणीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

हिंजवडी (ता.मुळशी, जि.पुणे) येथील आयटी कंपनीने कर्मचाऱ्यांचे वेतन थकविल्याबाबत

(२६) * **४०१७० श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंजवडी (ता.मुळशी, जि.पुणे) आयटी पार्क परिसरात सन २०२५ च्या मध्यावधीत सुरू झालेल्या 'Thynk Technology India' नामक आयटी कंपनीने सुमारे ७०० प्रशिक्षणार्थी व कर्मचाऱ्यांचे सुमारे चार महिन्यांचे वेतन थकवून एका रात्रीत अचानक कार्यालय बंद केल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीमार्फत प्रशिक्षणार्थींकडून प्रत्येकी सुमारे रु.१५ हजार इतकी अनामत रक्कम घेण्यात आली असून कार्यालय बंद केल्यानंतर सदर रक्कमदेखील संबंधितांना परत करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कामगार विभाग, पोलिस प्रशासन अथवा सायबर विभागामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, सदर चौकशीच्या अनुषंगाने भविष्यात अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी आयटी कंपन्यांच्या नोंदणी, आर्थिक पडताळणी, प्रभावित कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन व अनामत रक्कम परत मिळवून देणे तसेच कर्मचाऱ्यांच्या संरक्षणासंदर्भात शासनाने कार्यवाही करण्यासह संबंधित कंपनीचे संचालक व जबाबदार व्यक्तींविरुद्ध फसवणूक, वेतन थकविणे तसेच आर्थिक गैरव्यवहार करणे यासंदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आकाश फुंडकर : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सद्य:स्थितीत, कंपनीचे मालक व जबाबदार व्यक्तीं विरोधात फसवणूक, वेतन थकविणे व आर्थिक गैरव्यवहार या बाबत संबधीत आस्थापनेचे मालक श्री.हर्षल भानुदास ठाकरे व इतर दोन जबाबदार व्यक्ती यांचे

विरोधात हिंजवडी पोलीस ठाणे येथे दि. ०१/०६/२०२६ रोजी एफआयआर (FIR No.३७१/२०२६) दाखल करण्यात आलेला असून, भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम ३१६ (२), ३१८ (४), ३ (५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामधील श्री.हर्षल भानुदास ठाकरे, रा.फ्लॅट नं.१०७, श्री.गणेश अपार्टमेंट, धात्रक फाटा, नाशिक यास अटक करण्यात आली असून तो सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. याबाबत संबंधित पोलीस स्टेशनमार्फत पुढील तपास सुरू आहे.

मे.थिंकटेक इंडिया ओपीसी प्रा.लि., हिंजवडी, पुणे ही अस्थापना रातोरात बंद होऊन ७०० हून अधिक कर्मचारी यांची आर्थिक फसवणूक केले असल्याचे वृत्त स्थानिक प्रसार माध्यमातून व वृत्तापत्रातून प्रसिध्द झाल्याचे दि.२५/०५/२०२६ रोजी अपर कामगार आयुक्त, पुणे कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे. तथापि, याबाबत संबंधित स्थापनेतील कर्मचारी व या क्षेत्रातील संघटना यांचेकडून कामगार कार्यालयास कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने प्रभावित कर्मचाऱ्यांचे थकित वेतन व अनामत रक्कम परत मिळवून देणे, याबाबत क्षेत्रिय सरकारी कामगार अधिकारी यांनी दि. ०१/०६/२०२६ रोजी मे.थिंकटेक इंडिया ओपीसी प्रा.लि. हिंजवडी, पुणे या अस्थापनेस भेट दिली असता सदर अस्थापना बंद स्थितीत आढळून आली असल्यामुळे सदर अस्थापनेस निरीक्षण शेरे पारित करता आले नाहीत.

अशाप्रकारे कामगारांच्या आर्थिक फसवणूकीचे प्रकार पुन्हा होऊ नयेत, या करिता अपर कामगार आयुक्त, पुणे कार्यालयाचे पत्र, दि.०४/०६/२०२६ अन्वये जिल्हा माहिती अधिकारी, पुणे यांना शहरात व जिल्ह्यामध्ये अशाप्रकारचे आर्थिक फसवणूकीचे प्रकार होऊ नयेत, याकरिता त्यांचेस्तरावरून विविध वृत्तपत्रामध्ये व माध्यमाद्वारे प्रेसनोटच्या माध्यमातून जनजागृती करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील अवैध ‘आरओ’ प्रकल्पांवर नियंत्रण आणून भूजल पातळीचे संरक्षण करण्याबाबत

(२७) * **४१०४८ श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सोलापूर, नागपूर, अकोला, अमरावती, बुलढाणा, जळगाव यांसह विविध जिल्ह्यांमध्ये शुद्ध जलपेयाच्या नावाखाली अवैध व्यावसायिक ‘आरओ’ (Reverse Osmosis) प्रकल्पांमुळे भूजल पातळीला मोठा धोका निर्माण झाल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमानुसार भूगर्भातील पाणी उपशाची मर्यादा ५०० मीटरपर्यंत असताना अनेक अवैध व्यावसायिक ६०० ते ८०० मीटर खोल बोअर खोदून बेकायदा पाणी उपसा करत असल्याने गेल्या अडीच दशकांत भूजल उपशात १२ टक्क्यांनी वाढ होऊन दरवर्षी ७० टक्के पाण्याचा उपसा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यामध्ये पावसाचे केवळ ५० टक्के पाणी जमिनीत मुरत असून, अमर्याद उपशामुळे अमरावती आणि नागपूर जिल्ह्यातील काही गावे ‘ड्राय झोन’मध्ये गेली आहेत व यामुळे नियमांचे उल्लंघन होऊन भविष्यात भीषण भूजल संकट निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण अवैध ‘आरओ’ प्रकल्पांच्या व बेकायदा पाणी उपशाच्या प्रकाराची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने भूजल उपशावर नियंत्रण ठेवण्यासाठी तातडीने ठोस धोरण आखण्याबाबत तसेच प्रत्येक ‘आरओ’ प्रकल्पाला ‘ना हरकत प्रमाणपत्र’ व अधिकृत नोंदणी अनिवार्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील : (१) राज्यातील व्यावसायिक पिण्याच्या पाण्याच्या शुद्धीकरण (RO Plant) प्रकल्पांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्याची बाब राज्य शासनाच्या अखत्यारीत येत नसून, ती केंद्रिय भूमिजल प्राधिकरणाच्या (CGWA) अखत्यारीत येते.
(२) हे खरे नाही,

सन २००४ ते २०२५ या कालावधीतील भूजल मूल्यांकनाच्या अहवालानुसार दोन दशकांत भूजल उपशात वाढ झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. राज्यातील भूजल उपशाचे वार्षिक सरासरी प्रमाण सुमारे ५० % इतके आहे.
(३) हे खरे नाही,

मागील ३ वर्षातील भूजल मूल्यांकन अहवालानुसार, अमरावती आणि नागपूर जिल्ह्यातील गावे (ड्राय झोन मध्ये) अतिशोषित, शोषित, अंशतः शोषित या वर्गवारीत गेली नसून मागील ३ वर्षात सदर २ जिल्ह्यातील अतिशोषित, शोषित, अंशतः शोषित वर्गवारीतील गावांची संख्या कमी झाली आहे.
(४) राज्यातील व्यावसायिक पिण्याच्या पाण्याच्या शुद्धीकरण (RO Plant) प्रकल्पांना ना -हरकत प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही केंद्रिय भूमिजल प्राधिकरणाव्दारे (CGWA) केली जाते. त्यामुळे ना- हरकत प्रमाणपत्राशिवाय बेकायदा पाणी उपशाबाबतची माहिती राज्य शासनाकडे उपलब्ध नसल्याने याबाबत कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

केज (जि.बीड) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये अल्पवयीन मुलीवर उपचारास झालेला विलंब

(२८) * ४०२४७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज (जि.बीड) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्यानंतर त्याची प्राथमिक चौकशी करण्यासाठी दहा तास प्रतीक्षा करावी लागली असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अत्याचार झालेल्या अल्पवयीन मुलीवर डॉक्टर नसल्याचे कारण देत तिला प्रतीक्षा करावी लागली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची तक्रार स्थानिकांनी लोकांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी संबंधित प्रशासनाकडे केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर तक्रारीच्या अनुषंगाने दोषी असलेल्या डॉक्टर किंवा संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर : (१) व (२) अंशत: खरे आहे.

महिला पोलिस अधिकारी, केज पोलिस स्टेशन यांनी दि.२७/०५/२०२६ रोजी अल्पवयीन पिडीतेस उपजिल्हा रूग्णालय, केज येथे सकाळी ११.४५ वाजता वैद्यकीय तपासणीसाठी आणले असता ऑन ड्युटी वैद्यकीय अधिकारी यांनी पीडीत मुलीच्या आवश्यक त्या वैद्यकीय तपासण्या (रक्त तपासणी व सोनोग्राफी) केल्या. तथापि, त्यावेळी रूग्णालयातील ऑन कॉल महिला वैद्यकीय अधिकारी (भुलतज्ञ) या अन्य शस्त्रक्रियेत व्यस्त असल्याने व महिला वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोगतज्ञ) या गैरहजर असल्याने पिडीत अल्पवयीन मुलीची वैद्यकीय तपासणी वैद्यकीय अधिकारी (भुलतज्ञ) यांच्याकडून ४.३० वाजता सुरु करण्यात आली व रात्री ८.०० वाजता पूर्ण करण्यात आली.

(३) हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी सहाय्यक संचालक (वैद्यकीय), आरोग्य सेवा, लातूर व जिल्हा शल्यचिकित्सक, बीड यांनी सदर घटनेची चौकशी करुन प्राथमिक चौकशी अहवाल सादर केलेला आहे. सदर चौकशी अहवालानुसार याप्रकरणी दोषी आढळलेले उपजिल्हा रूग्णालय, केज येथील डॉ.दत्तात्रय केंद्रे, वैद्यकीय अधीक्षक, डॉ. प्रणिता गंगाधरराव पाटील, वैद्यकीय अधिकारी (भुलतज्ञ), डॉ.स्वाती साखरे, वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोगतज्ञ) व श्रीमती शिवकांता रामभाऊ गवळी, परिसेविका यांना दि.०१/०७/२०२६ रोजीच्या आदेशान्वये सेवेतून निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरूद्ध विभागीय चौकशीची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. तर श्रीमती अनिता बाबासाहेब मोराळे, अधिपरिचारिका (कंत्राटी), श्रीमती वैशाली पंडीत पारखे, अधिपरिचारिका (कंत्राटी) यांच्या सेवा समाप्त करण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील पाणीटंचाईची समस्या दूर करण्याबाबत

(२९) * ३९०५० श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या पाणीपुरवठा विभागाच्या साप्ताहिक अहवालानुसार केवळ २,२८५ महसूली गावे व वाड्या कागदावर टंचाईग्रस्त दाखविण्यात आल्या असल्यातरी प्रत्यक्षात राज्यातील तब्बल ८ ते ९ हजार गावे आणि वाड्या-वस्त्या सध्या तीव्र पाणीटंचाईचा सामना करत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कागदोपत्री ‘टँकरमुक्त जिल्हा’ दाखवण्याच्या प्रशासकीय दबावामुळे आणि टँकर मंजुरीच्या जाचक अटींमुळे राज्यातील हजारो टंचाईग्रस्त गावांसाठी ग्रामपंचायतींनी पाठवलेले टँकरचे प्रस्ताव लालफितीत अडकवून ठेवण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील १५ जिल्ह्यांमध्ये सध्या केवळ ७०६ टँकर्स सुरू असून, १,२०५ गावांमध्ये खासगी विहिरी अधिग्रहित केल्याने त्यांना अधिकृत टँकरच्या यादीतून वगळण्यात आले असून प्रत्यक्षात या गावांच्या अंतर्गत येणाऱ्या लहान वाड्या-वस्त्यांवर पिण्याच्या पाण्यासाठी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील प्रमुख धरणांमधील उपयूक्त जलसाठा निम्म्याहून अधिक घटून तो १४ टक्के ते २६ टक्यांची घट झाल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर भागातील नागरिकांची व जनावरांची पाण्यासाठी होणारी ससेहोलपट थांबवण्यासाठी, टँकर मंजुरीचे जाचक नियम शिथिल करून निकषानुसार तातडीने टँकर मंजूर करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाला देण्यासह विशेष निधीची तरतूद तात्पुरत्या उपाययोजना करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील : (१) हे अंशतः खरे आहे.

दि. २२ जून २०२६ रोजीच्या टॅंकर अहवालानूसार राज्यातील टंचाईग्रस्त २४ जिल्ह्यांमधील १,२७९ गावे व ३,३८९ वाड्या अशा एकूण ४,६६८ ठिकाणी १,४१३ टॅंकरद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे.

तसेच राज्यातील अन्य टंचाईग्रस्त असलेल्या १२,४०६ इतक्या गावे व वाड्यांमध्ये पाणी टंचाई निवारणार्थ टॅंकर व्यतिरीक्त विहिर अधिग्रहण, विंधण विहीर घेणे, नळ पाणी पुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती, तात्पुरत्या पुरक नळ पाणी पुरवठा घेणे इत्यादी उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

(२) हे खरे नाही.

राज्यातील टंचाई क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याची निकड विचारात घेऊन टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करण्यास मान्यता देण्याचे जिल्हाधिकारी यांना असलेले अधिकार आवश्यकतेनुसार संबंधित उप विभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी यांना दि. २०/०४/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आले आहेत.

दि. २२ जून २०२६ रोजीच्या टॅंकर अहवालानूसार राज्यातील टंचाईग्रस्त २४ जिल्ह्यांमधील १,२७९ गावे व ३,३८९ वाड्या अशा एकूण ४,६६८ ठिकाणी १,४१३ टॅंकरद्वारे सुरळीतपणे पाणी पुरवठा सुरु आहे.

(३) अशी बाब नाही.

दि. २२ जून २०२६ रोजीच्या टॅंकर अहवालानूसार राज्यातील टंचाईग्रस्त २४ जिल्ह्यांमधील १,२७९ गावे व ३,३८९ वाड्या अशा एकूण ४,६६८ ठिकाणी १,४१३ टॅंकरद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे.

तसेच राज्यातील अन्य टंचाईग्रस्त असलेल्या १२,४०६ इतक्या गावे व वाड्यांमध्ये पाणी टंचाई निवारणार्थ टॅंकर व्यतिरीक्त विहिर अधिग्रहण, विंधण विहीर घेणे, नळ पाणी पुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती, तात्पुरत्या पुरक नळ पाणी पुरवठा घेणे इत्यादी उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

(४) हे खरे आहे.

माहे मे अखेरीस जलसंपदा विभागातील मोठ्या प्रकल्पांमध्ये सरासरी पाणीसाठा २७%, मध्यम प्रकल्पांमध्ये ३३% व लघु प्रकल्पांमध्ये २७ % पाणी साठा उपलब्ध होता. भारतीय हवामान खात्याने अल-निनो व आयओडी याबाबत वर्तविलेल्या अंदाजाच्या अनुषंगाने जलसंपदा विभागाने शासन पत्र, दि.१७/०३/२०२६ आणि दि.१२/०५/२०२६ च्या अन्वये संपूर्ण राज्यभरात भविष्यात आवश्यक असणाऱ्या पेयजलाचे दि.३१ ऑगस्ट, २०२६ पर्यंत नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

(५) राज्यातील टंचाई क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याची निकड विचारात घेऊन टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करण्यास मान्यता देण्याचे जिल्हाधिकारी यांना असलेले अधिकार आवश्यकतेनुसार संबंधित उप विभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी यांना दि. २०/०४/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आले आहेत.

दि. २२ जून २०२६ रोजीच्या टँकर अहवालानूसार राज्यातील टंचाईग्रस्त २४ जिल्ह्यांमधील १,२७९ गावे व ३,३८९ वाड्या अशा एकूण ४,६६८ ठिकाणी १,४१३ टँकरद्वारे सुरळीतपणे पाणी पुरवठा सुरु आहे.

राज्यातील ३४ जिल्ह्यांनी माहे ऑक्टोबर, २०२५ ते जून, २०२६ या पाणी टंचाई कालावधीकरीता रु.६४४.६१ कोटी रुपयांचा संभाव्य टंचाई कृती आराखडा तयार केला आहे. सदर आराखड्यानूसार परिस्थितीनिहाय विहिर अधिग्रहण, विंधण विहीर घेणे, नळ पाणी पुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती, तात्पुरत्या पुरक नळ पाणी पुरवठा घेणे, टँकरने पाणी पुरवठा करणे इ. उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

जिल्ह्यांमध्ये राबविलेल्या उपाययोजनाच्या अनूषंगाने जिल्हा परिषदांनी केलेल्या मागणीनूसार निधी वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

विधान भवन
मुंबई.

जितेंद्र भोळे
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.